अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासासाठी भाडे तत्वावरील नियुक्त केलेल्या एजन्सीला मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.विचासं-१११७/प्र.क्र.१०७ (भाग-२)/ २८-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक: २० फेब्रुवारी, २०१९.

वाचा : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.विचासं-१११४/ प्र.क्र.४७/ २८-अ, दि.१५ फेब्रुवारी, २०१८.
२) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.विचासं-१११७/ प्र.क्र.१०७/ २८-अ, दि.४ मे, २०१७
३) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.विचासं-१११८/ प्र.क्र.१६०/ २८-अ, दि.७ फेब्रुवारी, २०१९ (दि.१/१/२०१९ चे शक्ती प्रदत्त बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना :

राज्यातील अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासाकरीता भाडे तत्त्वावरील वाहन उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक ४/५/२०१७ च्या शासन निर्णया अन्वये नियुक्त एजन्सीना मुदतवाढ देणे किंवा नविन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शासनाच्या अधिनस्त असलेल्या विमानचालन संचालनालयाच्या कामकाजाशी संबंधित बाबींसंदर्भात निर्णय घेण्यासाठी उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या शक्ती प्रदत्त समितीची दिनांक १/१/२०१९ रोजी बैठक घेण्यात आली. शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १/१/२०१९ च्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

शासन निर्णय :

राज्यातील अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासासाठी भाडे तत्त्वावर हवाई वाहन उपलब्ध करुन घेण्यासाठी दिनांक ४/५/२०१७ च्या शासन निर्णयान्वये नियुक्त करण्यात आलेल्या **मे.ॲडोनीस एव्हीएशन एन्टरप्रायजेस व मे.ॲलॉफ्ट एव्हीएशन प्रा.लि.** या दोन एजन्सी सोबत सध्या अस्तित्वात असलेल्या कराराला तीन महिने किंवा निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. या बाबतचा होणारा खर्च मागणी क्र.ए-४, “२०७०-इतर प्रशासकीय सेवा (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) विमान चालन सल्लागार, महाराष्ट्र शासन (अनिवार्य) २०७० ०१५६” या लेखाशिर्षातंर्गत **५०-इतर खर्च** या उद्दिष्टाखाली संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा, व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदरहू आदेश विमानचालन संचालनालयाच्या विविध बाबींवर निर्णय घेण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१.०१.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०२२२१७१३५६४८०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

BHARAT BUDHAJI GAWADE

Digitally signed by BHARAT BUDHAJI GAWADE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=bc303d0b23c9b2e6456454666136340 0c4a360e6c6fbdefca273e2f5d2a43be7,
postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI,
serialNumber=af4e3993e4dd3610fcb21aece361e641ad3d33d96f04d57673c4fca72eb10c92,
ou=GAD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=BHARAT BUDHAJI GAWADE
Date: 2019.02.22 17:16:07 +05'30'

(भ.बु.गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव (मा.मुख्यमंत्री कार्यालय), मंत्रालय, मुंबई
७. मा.राज्यपाल यांचे परिसहायक, राजभवन, मुंबई.
८. महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई.
१०. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई
१२. उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१५. सामान्य प्रशासन विभाग / कार्या.२५, मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती.